**Estd 1962**
**Naac 'A++' Grade**

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## २८/८/२०२१

शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील मार्च/एप्रिल २०२१ च्या परीक्षा दि.१० ऑगस्ट २०२१ पासून ऑनलाईन पध्दतीने सुरळीतपणे सुरु झाल्या.

आज दि. २८ ऑगस्ट २०२१ रोजी **B.A., B.Com , B.Sc., M.A., M.Com., M.Sc., Bachelor of Interior Designing, Bachelor of Dress Making & Fashion Co-ordination, Bachelor of Designing, Master of Valuation, B.Sc./M.Sc. (Nano Sc. and Technology), M.A./M.Sc. – Maths / Geography, B.Tech (All Branches), BCA, MCA, MSW, MRS, MPA (Music), M.J., B.Voc.** इ. अभ्यासक्रमाच्या परीक्षा पार पडल्या.

आजच्या परीक्षेसाठी ४२८६० विद्यार्थ्यांपैकी ३९७३३ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने परीक्षा दिली. ऑनलाईन परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांना काही तांत्रिक अडचण उद्‌भवू नये यासाठी तांत्रिक अडचणीचे निराकरण करणेसाठी परीक्षा विभागातील अधिकारी व कर्मचारी वर्ग तसेच सॉफ्टवेअर पुरवठादार कंपनीची यंत्रणा कार्यरत ठेवण्यात आली होती.

बुधवार दि.१८ ऑगस्ट २०२१ रोजी पार पडलेल्या परीक्षांमध्ये ज्या विद्यार्थ्यांना तांत्रिक कारणास्तव त्यांची परीक्षा देता आली नाही अशा विद्यार्थ्यांनी सदर परीक्षेची माहिती पुढील लिंकद्वारे त्यांचे निवेदन ऑनलाईन पध्दतीने संगणक प्रणालित सादर करावे. लिंक पुढीलप्रमाणे आहे.

**unishivaji.ac.in / online.unishivaji.ac.in** या वेबसाईट पोर्टलवर –

**Link – Application for re-examination of students who had technical problems in the examination held on 18/8/2021**

तसेच विद्यापीठामार्फत देण्यात येणा–या अधिकच्या सूचना विद्यार्थ्यांना त्वरित समजता याव्यात यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी विद्यापीठाचे संकेतस्थळ, स्वत:चा ईमेल तसेच नोंदणीकृत मोबाईल वारंवार पाहून त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**तसेच उद्या रविवार दि.२९ ऑगस्ट २०२१ रोजी पदवी स्तरावरील सत्र चार मधील आवश्यक असणा–या ''पर्यावरण अभ्यास'' या विषयाची परीक्षा दुपारी १२.३० ते १.३० या वेळेत आयोजित करण्यात आली असून सदर परीक्षेस एकुण ५१ हजारापेक्षा जास्त विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. यासंबंधीचा परीक्षेचा युजर आयडी व पासवर्ड हा संबंधित विद्यार्थ्यांना एसएमएस व ईमेल द्वारे पाठविण्यात आलेला आहे. तसेच या होणा–या परीक्षेची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावरही ठेवण्यात आली आहे. या परीक्षेसंबंधी विद्यार्थ्यांना जर काही तांत्रिक अडचणी आल्या तर त्यांनी आपल्या शंकाचे निरसन ९५१३८२४१२३ व ९५१३८२४२३४ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा.**

**त्याचप्रमाणे विद्यार्थी मुख्य परीक्षा देत असताना त्यांना कोणतीही तांत्रिक अडचण येवू नये, यासाठी आवश्यक असणारी परीक्षेसाठीची मॉकटेस्ट ज्या विद्यार्थ्यांनी अद्यापही दिलेली नाही, अशा विद्यार्थ्यांनी सदरची मॉकटेस्ट त्वरित देण्याबाबतचे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक श्री.गजानन पळसे यांनी महाविद्यालयास केले.**